# `डॉ.आंबेडकरांचे धर्मांतर आणि समाजपरिवर्तन'

**प्रा. डॉ. सिद्राम किशनराव मुंडे**
गजानन महाराज कला व वाणिज्य महाविद्यालय,
मुकुटबन ता. झरी जि. यवतमाळ
मो. ९६०४१५५५७०

---

माणसाशी माणुसकीने वागणाऱ्या बौद्ध धर्माला स्वीकारण्याचे एक ऐतिहासिक कार्य २० व्या शतकामध्ये महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी केले. ही जगाच्या इतिहासातील एक क्रांतिकारक अशी घटना आहे. ज्या हिंदू धर्माने हजारो वर्षापासून वर्ण व्यवस्थेच्या आधारे मानवालाच शूद्र बनवून बौद्धिकदृष्ट्या विकलांग बनविले, त्याच व्यवस्थेतील बारीक-सारीक दोष तपशिलासह दाखविण्याचे मौलिक कार्य पहिल्यांदा बाबासाहेबांनी केले. महात्मा फुल्यांनी ज्या समाज सुधारणेचे धोरण प्रत्यक्षात आणण्यासाठी देह झिजवला त्याला प्रत्यक्षात साकार केले तेही बाबासाहेबांनीच. त्यामुळे डॉ. आंबेडकर हे या पृथ्वीतलावरील अमानवी मूल्यांना पुरून उरणाऱ्या क्रांतिकारी पर्वाचे नाव आहे. त्यामुळे मानवी जीवनाचाच कायापालट करून जगण्याचा खरा मार्ग दाखविण्याचे श्रेय फुल्यांच्या कार्यकर्तृत्वानंतर सर्वस्वी बाबासाहेबांनाच जाते यात तिळमात्र शंका नाही.

जी गोष्ट किंवा घटना मानवी हित नजरेसमोर ठेवून निर्माण केली जात असते त्यामध्ये समाजाच्या विकासाबरोबरच नवे वैचारिक युग निर्माण करण्याची क्षमताही असते. अर्थात, बाबासाहेबांनी जे धर्मांतर केले, ते स्वत:च्या स्वार्थाकरिता किवा नावलौकिक मिळावा म्हणून नव्हे तर बालपणापासून हिंदू म्हणून जीवन जगताना सवर्णांकडून मानवेत्तर प्राण्यांसारखी जी वागणूक दिल्या गेली त्याचेही खोलवर संस्कार त्यांच्या मनावर बसलेले होते. शिवाय हिंदू संस्कृतीतील कोणतीही मूल्ये मानव वा समाजाच्या विकासासाठी परिपूर्ण नाही, हे ही स्पष्टरित्या दिसत होते.अध्यात्म् हाच मूलभूत पाया असलेल्या इथल्या हिंदू संस्कृतीत मानवी कर्तव्याला, श्रमाला, नव्या विचारांना कोणतेच स्थान नव्हते. ब्राह्मण वर्गियांकडून सामान्यांना गुलामासारखी वागणूक मिळत होती. तो आपले हक्क आणि माणूसपणच हरवून बसला होता. त्यावेळी त्या बहुजनांना विकासाच्या प्रवाहात उभे करायचे असेल तर कुचकामी ठरणाऱ्या हिंदू धर्माला हद्दपार करून मानवाला माणूस म्हणून प्रतिष्ठा देणारा धर्म स्वीकारायला हवा असे बाबासाहेबांना वाटले. सर्व धर्मांचा सखोल अभ्यास करून शेवटी भारतीय समाज परिवर्तनाकरिता कारक ठरणाऱ्या बौद्ध धर्माचा त्यांनी स्वीकार केला. 'जनता' साठी १६ मे १९५० रोजी लिहिलेल्या अंकात बाबासाहेबांनी हिंदू धर्माची आणि बौद्ध धर्माची सखोल चिकित्सकीय मीमांसा मांडली. त्यांची भिन्नता उलगडून दाखविताना बाबासाहेब म्हणतात, "हिंदू धर्माची उभारणी अमंगळ अशा भेदाभेदावरच झाली आहे; हे कोणासही नाकबूल करता येणार नाही. बुद्धांनी या चार वर्णाविरूद्ध आमरणांत बंड करून झगडा केला व त्यावर 'मुळे कुठार' घातली हे जगजाहिरच आहे.हिंदू

धर्मात शूद्र व स्त्रीयांना धर्म-शिक्षक होण्याची बंदी असून त्यांना परमेश्वर प्राप्तीसाठी संन्यास घेण्यास मनाई आहे. बुद्धांनी भिक्षू संघाचे दरवाजे स्त्रिया व शूद्रांसाठी मुक्त मनाने उघडे करून दिले." भेदाभेदावर उभ्या असणाऱ्या हिंदू धर्मात आलेली स्थिरता नेस्तनाबूद करून गुलामीत जगणाऱ्या स्त्रीला स्वत्वाची जाणीव करून देण्यासाठी बाबासाहेबांनी धर्मांतर केले.

हिंदू धर्माच्या कोंडवाड्यात अडकून जगणाऱ्या आणि कालपर्यंत सर्वांगीणरित्या पिचल्या गेलेल्या लोकांच्या आयुष्यात न्यायाची नवी पहाट आणणे बाबासाहेबांना एक उच्च शिक्षित मानव म्हणून विचार करताना महत्त्वाचे वाटले. कारण हिंदू धर्म एखाद्या लागण झालेल्या रोगाप्रमाणे घातक आहे. आणि जी गोष्ट मानवास, समाजास किंवा मानवी हिंताला घातक ठरते त्यावर त्वरित उपाययोजना करणे ही काळाची गरज असते. नेमकी ही पाऊले बाबासाहेबांनी ओळखली होती. कारण हिंदू धर्म हा माणूसकीच्या तत्त्वांचे पालन करणारा धर्म नसून, केवळ शिरजोरीची सजावट आहे. त्यामुळे माणसाची माणूसकी ओळखून त्यांचा गौरव करणे ही गोष्ट या धर्माला अधर्म असल्यासारखी वाटते. शिवाय या धर्मामध्ये अमंगल पशूचा स्पर्श झाला असता, तो चालतो परंतु खालच्या जातीतील माणसांचा स्पर्श चालत नाही. हा धर्म एका वर्गाला विद्या शिकू नये, धनसंचय करू नये, शस्त्र धारण करू नये असे सांगतो आणि वरच्या वर्गाला मात्र हे सर्व फायदे मिळवून देतो. कारण तो त्यांनीच (उच्च वर्णियांनी) आपल्या स्वार्थासाठी निर्मिलेला असतो. हे हिंदू धर्माच्या आधारे होत असलेले मानवाच्या जीवनाचे एकप्रकारे विडंबनच असून, त्याला शिक्षणापासून वंचित ठेवणारी संस्था असल्याचे बाबासाहेबांनी 5 ओळखले. म्हणूनच तळागाळातील सर्व लोकांना जीवनाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी नव्या धर्माची त्यांना गरज वाटली.

आज बाबासाहेबांच्या महानिर्वाणानंतरच्या अर्धशतकाचा आपण आढावा घेतल्यास स्पष्टपणे जाणवते की, मराठी साहित्याच्या दरबारात, 'दलित साहित्य' नावाची जी नवी संकल्पना रूजली, त्यांची मुख्य प्रेरणा डॉ. आंबेडकर, त्यांची विचारप्रणाली, जीवन संघर्ष आणि व्यक्तिमत्व हेच आहे. वेदना, विद्रोह नकार या त्रयींनी कालपर्यतच्या अल्पसंख्यांकांच्या मनोरंजनवादी अशा निरस साहित्याला जीवनसंघर्षाची ऊर्मी ही दलित, शूद्र म्हणून समजल्या जाणाऱ्या साहित्यिकांनीच दिली. केवळ २०-२५ वर्षाच्या काळात जागतिक पातळीपर्यंत भरारी मारण्याचे सामर्थ्य ज्या दलित साहित्याने यशस्वी करून दाखविले त्या साहित्याचे आद्य प्रेरणास्त्रोत बाबासाहेबच आहेत. त्यांनी, प्रत्येक व्यक्तिला आत्मसन्मानाने जगता येण्यासाठी जी धर्मांतराची भूमिका मांडली ती उज्ज्वलमय आहे. "आपल्या मातीमोल आयुष्याला सोन्याचे दिवस प्राप्त होण्यासाठीच मला धर्मांतराची आवश्यकता भासत आहे. तुम्हाला कर्तबगार बनविण्यासाठी मला धर्मांतर करायचे आहे. आज मी जे कार्य करित आहे, ते सर्व तुमच्याच हितासाठी करीत आहे. माझ्यापासून तुम्हाला जी काही मदत पाहिजे आहे ती द्यायला मी तयार आहे. तुम्हाला, तुमच्या या वाईट स्थितीतून मुक्त करण्याचे मी ठरविले आहे. माझ्यासाठी मी काहीच करीत नाही, परंतु तुम्हाला कर्तबगार बनविता येईल इतके कसोशीने प्रयत्न मी करीत राहणार आहे. तुम्ही आपल्या परिस्थितीची जाणीव करून घ्या व मी जो मार्ग दाखवितो तो

अनुसरा. म्हणजे तुमचे हित, तुमची कर्तबगारी फळास आल्याशिवाय राहणार नाही. 'सामान्य लोकांच्या जीवनाला उज्ज्वल करण्याचा भविष्यकालीन मार्ग म्हणून धर्मांतराची गरज त्यावेळी बाबासाहेबांनी प्रतिपादीत केली होती. मी तुमच्यासाठी श्रीकृष्णाप्रमाणे कुणी अवतारधारी नसून, जगण्याचा खरा मार्ग दाखविणारा सामान्य व्यक्ती आहे, असे सांगून स्वत:कडे मोठेपणाची कोणतीही गोष्ट लावणे ही बाब जाणिवपूर्वकरित्या टाळली.

हिंदू म्हणून जगताना जातीभेदाचे जे वाईट अनुभव माझ्या वाट्याला आले ते तुमच्याही वाट्याला येऊ नये अशी, धर्मातर करण्यामागे एक प्रामाणिक भूमिका आपली असल्याचे बाबासाहेबांनी सहकाऱ्यांना सांगितले. 'ज्या समाजात माणुसकीला थारा नाही, त्या निर्दय हिंदू समाजात निष्कारण मानहानी भोगीत जीवन कंठण्यात काय अर्थ ?' असा प्रामाणिक सवाल त्यांनी मांडला. जो असल्या निर्दय, अगतिमान धर्मात राहील तो गुलाम असून ज्याला माणुसकी पाहिजे असेल तो यापुढे कधीही या सैतानी धर्मात राहण्याचे धाडस करणार नाही याची त्यांना पुरेपूर खात्री होती. कोणत्याही परिस्थितीचा उपयोग करू न देता अज्ञानात आणि दारिद्र्यात जगत राहण्यास भाग पाडणाऱ्या धर्माची पर्वा कशाला बाळगायची ? आता आपल्याला वाडवडिलांप्रमाणेच हतबल, स्वाभिमानशून्य जगायचे नसून हिंदू धर्मातील गुलामीपेक्षा श्रेष्ठ दर्जाचे जीवन प्रदान करणाऱ्या बौद्ध धर्माची आवश्यकता भासेल याची बाबासाहेबांना जाणीव झाली होती. महाराष्ट्रातील अस्पृश्य महारांची संख्या अधिक असुनही अल्पसंख्यांकांसारखी त्यांची कुचंबणा होत असल्यामुळे त्यांच्यातील उच्च-नीच भाव नष्ट व्हावा ही बाबासाहेबांची एक समानधर्मी अपेक्षा होती. म्हणून महारांनीसुद्धा मांग व भंगी लोकांसोबत समानतेने वागण्याची भूमिका घेण्यास सांगितले. कारण बौद्ध धर्मात साऱ्या उपेक्षितांना सामावून घेण्याची ताकद आहे. ते कोणताही दुजाभाव बाळगण्याचे तत्त्वज्ञान देत नाही. सर्व मानवजातीला एकत्र बांधू पाहणारे मानवजातीचे स्वप्न रेखाटते.

जोपर्यंत अस्पृश्य, हिंदू धर्माच्या परंपरेनुसार आपलं जीवन व्यतित करतील, तोपर्यंत त्यांच्यात कोणत्याही पद्धतीने सुधारणा संभवणार नाही याची बाबासाहेबांना जाणीव होती. जातीभेदाची चौकट मोडल्याशिवाय परिवर्तनाची लाट अस्पृश्यांच्या जीवनात येणार नसल्यामुळे या चौकटीतून त्यांना बाहेर काढणे गरजेचे वाटले. स्पृश्य हिंदू प्रथम अस्पृश्यांमध्ये जे जातीभेद आहेत ते मोडा व मग आम्हाला जातीभेद सोडायला सांगा अशी भूमिका बाळगणाऱ्यांना बाबासाहेबांनी 'जोपर्यंत आम्ही तुमच्या (हिंदू) धर्मात आहोत तोपर्यत आम्हास आमच्यातील जातीभेद मोडता येणार नाही. 'असे सडेतोड उत्तर दिले. धर्मांतर हा जातीभेदाच्या नष्टतेवरील उपाय असून, " धर्मांतराने खुद्द महारांपेक्षा अल्पसंख्यांक अशा भंगी व मांग समाजाचे जास्त कल्याण होईल. ते सर्व महारांच्या एकाच पातळीवर येतील. आणि म्हणून मांग किंवा भंगी जातींनी या धर्मांतराच्या प्रश्नास जास्त जोराचा पाठिंबा देणे त्यांच्याच फायद्याचे आहे. जातीभेद नष्ट करणे हे, स्वराज्य संपादनापेक्षाही जास्त पवित्र कार्य आहे. संपूर्ण हिंदुस्थानातील जातीभेद जेव्हा कधी नष्ट व्हायचा असेल तेव्हा तो होवो, पण अस्पृश्य समाजातील जातीभेद मला नष्ट करता आल्यास मी स्वतःला भाग्यवान

पुरूष समजेन." अशी खुद्द बाबासाहेबांनी अल्पसंख्यांकाची बाजू घेत अस्पृश्यांच्या समाजात एखाद्या गोचिडाप्रमाणे चिकटलेल्या रक्तपिऊ जातीभेदाला नष्ट करण्याची गरज मांडली.

धर्मांतराची गरज ही मानव आणि समाजाच्या विकासासाठी कारकच राहील यात कुणीही दुमत मांडण्याचा प्रश्नच उद्भवत नाही. परंतु, धर्मांतराचा विषय जितका महत्त्वाचा आहे, तितकाच तो गहन असल्याचीही जाणीव बाबासाहेबांना होती. साध्या माणसाच्या बुद्धिला हजारो वर्षांपासून चिकटलेले हिंदू धर्मव्यवस्थेचे भूत डोक्यातून बाहेर काढणे ही साधी गोष्ट नव्हती. परंतु, व्यक्तिच्या मनाची, बुद्धिची यासाठी पहिल्यांदा तयारी करून घ्यावी लागेल हे जाणूनच त्यांनी धर्माचा सामाजिक, धार्मिक, ऐहिक आणि तात्विक दृष्टीने विचार मांडला. अस्पृश्यतेच्या आधारे बहुजनांवर होत असलेल्या अन्यायावर योग्य मार्गाने बाधा आणण्यासाठी नवीन धर्म लोकांच्या पदरात घालण्याची गरज बाबासाहेबांना वाटली. म्हणून त्यांनी पहिल्यांदा अस्पृश्यांची परिषद बोलावून त्यामध्ये आपण धर्मांतरासाठी करीत असलेल्या आराखड्याची बाजू लोकांना पटवून दिली. सर्वांची समजूत पटल्याशिवाय कुणीही धर्मात येणार नसल्यामुळे धर्मांतरामुळे होणाऱ्या सोयी- सवलती व फायद्यांचा परिचय त्यांना करून देणे महत्त्वाचे होते.

बाबासाहेबांनी धर्मपरिवर्तनाच्या मानव व समाजाला मिळणाऱ्या सकारात्मक लाभाच्या बाजू समजावून सांगितल्या. दैववादातून उठून वास्तवाचे खरे भान बौद्ध धर्माच्या आधारे जनसामान्यांना जीवनाच्या परिवर्तनासाठी थेटपणे करून दिले. बहुजनांना आठवड्यातून तीन दिवस पोटभर अन्न मिळावे म्हणून जी मारामार करावी लागत होती याची पूर्णत: जाणीव बाबासाहेबांना होती. सन्मानाने जगून पोटभर अन्न खाता यावे यासाठी प्रत्येकाने लाचारीचे जगणे सोडले पाहिजे त्यांनी लाचारी सोडून आपल्या कंगाल परिस्थितीवर मात करावी असे गोरगरिबांच्या जीवनाविषयी उज्ज्वल भविष्यकालीन स्वप्न रेखाटले होते.

उपजिविकेची साधने गोरगरिबांना मिळून पोलिसाची नोकरी वाट्याला यावी अशी त्यांची अपेक्षा होती. स्पृश्य समाजातील २-३ इयत्ता शिकणाऱ्या स्पृश्य समाजातील कोणाही माणसाला नोकरी मिळू शकते परंतु, नोकरीचा मुद्दा तर दूरच साधे शिक्षण घेण्याचाही अधिकार आपल्या समाजाला नसल्याची खंत बाबासाहेबांना वाटत होती. म्हणूनच तुम्हाला गुलामाप्रमाणे राहायचे आहे की, स्वतंत्र माणसाप्रमाणे जगायचे आहे? याचा आज तुम्हाला विचार करायचा आहे. त्याचप्रमाणे तुमच्या मार्गात येणाऱ्या अडचणी कशा दूर करता येतील हे सुद्धा तुम्हालाच पाहायचे आहे. असे सांगून बौद्ध धर्मांतराने मानवाच्या जीवनातील अनेक मोठया समस्यांचे निराकरण करणे सहज शक्य होईल असा आत्मविश्वास दिला. हा आत्मविश्वास त्यांच्याकडे अखंड ज्ञान आणि चिंतनातून आला.

बौद्ध धर्म स्वीकारताना त्यांनी स्वातंत्र्य, समता, बंधुतेचा महान आदर्श नजरेसमोर ठेवल्याचे दिसते. महार, शूद्र म्हणून संबोधल्या गेलेल्या जनतेला १४ ऑक्टोबर १९५६ रोजी बौद्ध धर्म दीक्षा स्वीकारताना जी सावधगिरी बाळगण्यासाठी जबाबदारीच्या भविष्यकालीन सूचना बाबासाहेबांनी केल्या त्यात ते म्हणतात,

"तुमचीही जबाबदारी मोठी आहे. तुमच्याबद्दल इतर लोकांना आदर वाटेल, मान-सन्मान वाटेल अशी कृती तुम्ही केली पाहिजे. हा धर्म म्हणजे, आपण गळयात एक मढे अडकवून घेत आहोत असे मानू नका. बौद्ध धर्माच्या दृष्टिने भारताची भूमी सध्या शून्यवत आहे. म्हणून आपल्याला उत्तमरीतीने धर्म पाळण्याचा निर्धार केला पाहिजे. नाही तर महार लोकांनी हा धर्म निंदाजनक स्थितीस आणला असे होऊ नये म्हणून आपण दृढनिश्चय केला पाहिजे. हे आपल्याला साधले, तर आपण आपल्या बरोबर देशाचाच नाही तर संपूर्ण जगाचाही उद्धार करू शकतो. कारण बौद्ध धर्मानेच जगाचा उद्धार होणार आहे. जगात जोपर्यंत न्याय मिळत नाही तोपर्यंत शांतता राहणार नाही. अर्थात कोणताही धर्म केवळ लोकांच्या हाती सोपविल्यानेच तो यशस्वी होत नसतो, तर त्या धर्मामध्ये सांगितलेल्या विचार-आचारांना प्रत्यक्षपणे जगताना समाजात योग्यरित्या वापरण्याची गरज असते. जो धर्म मानव आणि समाजाच्या कल्याणासाठी आवश्यक असलेली काळानुरूप योग्य भूमिका प्रदान करण्यास यशस्वी ठरतो. त्यालाच जागतिक श्रेष्ठत्व मिळत असते. आज चीन, जपान, मलाया, थायलंड या देशांमध्ये गौतम बुद्धाच्या विचारांनी जो परिणाम साधला, तो हिंदू धर्माला येणाऱ्या हजारो वर्षातही प्राप्त करता आला नसता. यावरून बौद्ध धर्माकडे इतर धर्मापेक्षा वेगळ्या अंगाने पाहण्याचा, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा दृष्टिकोन किती व्यापक आणि यशस्वीपूर्ण होता याचा सारासार प्रत्यय येतो. मानवाला समानतेनी माणूस म्हणून वागविण्याची महान बीजे या धर्मात दडलेली आहेत.

धर्मांतराचे समाजावर आणि मानवी जीवनावर झालेले चांगले परिणाम आजच आपल्याला पाहायला मिळणार नाही याची पूरेपूर जाणीव बाबासाहेबांना होती. म्हणूनच दहा-वीस वर्षांनी जी फळे आपल्या दृष्टिस पडणार आहेत,त्यांचे बी तरी आज लावले पाहिजे. ते लावले नाही तर झाडही नाही आणि फळ तर नाहीच नाही. अशावेळी आपल्याला थांबविण्याची जे भूमिका घेतील ते आपले दोस्त नसून दुश्मन आहेत असे समजायचे असे त्यांनी सहकाऱ्यांना बजावून सांगितल्याचे दिसते. धर्मांतर करताना मानव समाजाच्या हिताकरिता त्यामध्ये कोणतीही त्रुटी राहू नये याची पूरेपूर खबरदारी बाबासाहेबांनी घेतली. कारण हे धर्मांतर आपण वैयक्तिक प्रतिष्ठेसाठी करीत नसून, लोकांनी जो आपल्यावर विश्वास टाकला आहे त्याला पूर्णत्वाला नेण्यासाठी करीत आहोत याची पूरेपूर जाणीव त्यांनी ठेवली होती. आपल्या हातून थोडीशी जरी चूक झाली, तरी त्याचे परिणाम आपल्या सात कोटी बांधवांना भोगावे लागतील याची त्यांना जाणीव होती.

जोपर्यंत हिंदू धर्म आहे तोपर्यंत महारवाडा, मांगवाडा या देशामध्ये राहणारच याची खात्री बाबासाहेबांना होती. म्हणूनच झुणका भाकरीसारखा कार्यक्रम या देशातील धर्म व रूढींमध्ये बदल करू शकत नाही. तसेच जोपर्यंत समाजसुधारणेचे घोंगडे पांघरणारे ब्राह्मण, धर्ममार्तंड आहेत तोपर्यंत हे असेच चालणार हेही बाबासाहेबांना माहीत होते. म्हणूनच त्यांच्यातील खोलवर व्यासंगाबाबत, " हिंदू धर्म हा याप्रमाणे आधुनिक लोकशाही मूल्यांशी विसंगत आहे; असे प्रदीर्घ व्यासंगानंतर बाबासाहेबांचे मत बनले. निरनिराळ्या धर्मांचा तुलनात्मक अभ्यास केल्यानंतर, बौद्ध धर्म हाच व्यक्तीचा विकास आणि सामाजिक समतेला पोषक असा धर्म आहे, अशी त्यांची खात्री झाली. म्हणूनच १९५६ साली त्यांनी हिंदू धर्माचा त्याग

करून आपल्या हजारो अनुयायांसह बौद्ध धर्माची दीक्षा घेतली. अशी नलीनी पंडित यांनी ज्वलंतशील भूमिका व्यक्त केल्याचे दिसते.

एखादी घटना वा क्रिया अमलात आणायची असेल तर त्यासाठी कराव्या लागणाऱ्या सर्व गोष्टींचा खोलवर अभ्यास बाबासाहेब करीत असत. बौद्ध धर्म स्वीकारतानासुद्धा बाबासाहेबांनी शीख, इसाई, मुस्लीम, ख्रिस्ती धर्माचा सखोल अभ्यास आणि माहीती करून घेतली. स्त्री-पुरूषांना स्वातंत्र्याची समान संधी देणारे बुद्धाचे विचार नव्या युगाची निर्मिती करून हिंदू धर्मावर मात करेल असा विश्वास वाटला. त्यामुळेच ब्राह्मणी धर्माचं घाण पाणी काढून बाहेर घालवायचे आणि बहुजनाना न्याय देण्यास पोषक व परिपूर्ण ठरेल अशा बौद्ध धर्माची उभारणी करून सामान्यांचे युग जन्माला घालावे हे यामागील विशेषत्व होते. त्यामुळेच डॉ. आंबेडकर नव्या युगधर्माचे कर्ते सुधारक, तत्त्वज्ञानी ठरतात.

**संदर्भ ग्रंथ :**


- मा. फ. गांजरे (संपा) "डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची भाषणे खंड-६," अशोक प्रकाशन, नागपूर. पुनर्मुद्रण प्रकाशन वर्ष दिलेले नाही, पृ. २७
- वसंत मून व इतर (संपा) "डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची भाषणे भाग १ (१९२० ते १९३६)", डॉ. बाबासाहेब आंबेडकर चरित्र साधने प्रकाशन समिती, मुंबई, २००२ पृ. ४६१.
- तत्रैव, पृ. ४४६
- वसंत मून व इतर (संपा) "डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची भाषणे भाग- ३ (१९४६ ते १९५६)", डॉ. बाबासाहेब आंबेडकर चरित्र साधने प्रकाशन समिती,मुंबई, २००२, पृ.५२५
- प्रा. केशव मेश्राम व इतर (संपा) "डॉ. बाबासाहेब आंबेडकर गौरव ग्रंथ" महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, पुनर्मुद्रण १९९९ पृ. २३२-२३४ (श्रीमती नलीनी पंडित यांच्या 'डॉ. आंबेडकरांचे धर्मचिंतन' या लेखातून)